साप्ताहिक

# परळी परिसर

Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25

* परळी वैजनाथ * सोमवार, दि. २९ डिसेंबर २०२५ * पाने-४ * २/- ₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...

न्यू सुधांशू प्रिंटर्स

श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075

कापडी पिशव्या छापून मिळतील.

# पर्यावरण मंत्र्याच्या गावातच पर्यावरणाला धोका!

## दिवसाबरोबर रात्रीही डोंगराचे खोदकाम सुरू!



## शंकर पार्वतीनगर भागातील रहिवाश्यांची झोप उडाली

परळी वैजनाथ (लक्ष्मण वाकडे):- शहरातील अंबाजोगाई मार्गावरील शंकर पार्वतीनगर भागात जेसीबी सारख्या यंत्रणेने डोंगर फोडण्याचे काम दिवसाबरोबर रात्रीही सुरू असून या यंत्राच्या खोदकामाच्या आवाजाने या भागात राहणाऱ्या अनेक नागरिकांची रात्रीची झोप उडवली आहे.

याकडे इथल्या महसूल प्रशासनाने पाठ फिरवल्याने या भागातील सर्वसामान्य नागरिक चांगलेच संतप्त झाले आहेत. मागच्या अनेक वर्षापासून या भागातील डोंगराचे सपाटीकरण सुरू आहे. जेसीबी सारख्या यंत्रणेच्या माध्यमातून दिवस-रात्र खोदकाम करून या भागातील अनेक डोंगर उध्वस्त करून टाकले गेले आहेत. या भागात प्लॉटिंगला आलेला चांगला भाव यामुळे जमीन मालक आपल्या ताब्यातील डोंगर भूईसपाट करत आहेत. डोंगर भुईसपाट होत असल्यामुळे या डोंगरावर असलेली शेकडो झाडांची कत्तल झाली आहे. हे डोंगर भुईसपाट करण्यास व झाडांची कत्तल करण्यास परळीच्या महसूल प्रशासनाने कोणत्या कायद्यात परवानगी दिली आहे, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. हजारो झाडांची तोड डोंगराच्या सपाटीकरणामुळे झाली आहे. परळी शहर व परिसराच्या पर्यावरणाला यामुळे धोका निर्माण झाला आहे. राज्याचे पर्यावरणमंत्री म्हणून काम पाहणाऱ्या मंत्र्याच्या गावातच पर्यावरणाचे तीन-तेरा वाजले आहेत.

दरम्यान शंकर-पार्वतीनगर भागात गेल्या काही दिवसापासून दिवसाबरोबर रात्रीही जेसीबी सारख्या यंत्राने डोंगर खोदण्याचे काम सुरू असल्याने व त्याच्या आवाजाने या भागात राहणाऱ्या अनेक सर्वसामान्यांची रात्रीची झोप उडवली आहे. त्यांच्या झोपेचे खोबरे केले आहे. यामुळे या भागातील अनेक नागरिक परळीतील महसूल प्रशासनाच्या कारभारावर तीव्र नाराज होऊन संतप्त झाले आहे. याकडे जिल्हाधिकारी व इतर संबंधितांनी आता लक्ष देण्याची मागणी होत आहे. दरम्यान, शंकरपार्वतीनगर भागातील डोंगराच्या खोदकामात त्या ठिकाणी असलेल्या शेकडो झाडांची कत्तल होत असतानाही परळीचे पर्यावरण प्रेमी डोळे झाकून का गप्प बसले आहेत. तसेच रात्री डोंगर फोडण्यास इथल्या महसूल प्रशासनाने संबंधितांना कशी परवानगी दिली? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. ***

## नगराध्यक्षा पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी ३ जानेवारीला स्वीकारणार पदभार



परळी वैजनाथ, (बातमीदार):-ना.पंकजाताई मुंडे व आ.धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस व महायुतीच्या अधिकृत उमेदवार म्हणून प्रचंड मताधिक्याने विजयी झालेल्या परळी नगर परिषदेच्या थेट लोकनिर्वाचित नगराध्यक्ष सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी या नगराध्यक्ष पदाचा पदभार ३ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १ वा. घेणार आहेत.

परळी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ मध्ये थेट जनतेतून नगराध्यक्षपदाची निवड झाली. यामध्ये मराठवाड्यात सर्वाधिक मताधिक्याने विजयी होणाऱ्या नगराध्यक्षा म्हणून परळीच्या नगराध्यक्षांनी बहुमान मिळवला आहे. ना.पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी व महायुतीच्या उमेदवार म्हणून परळीतून थेट लोकनिर्वाचित नगराध्यक्षा झालेल्या सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी या आपल्या नगराध्यक्षपदाचा पदभार येत्या ३ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १ वाजता घेणार आहेत. नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी परळीच्या विकासाचा नवसंकल्प करत परळीच्या विकासाची पंचसूत्री परळीकरांना सादर केलेली आहे. परळीचा सर्वंकष व चौफेर विकास करण्याचे अभिवचन पूर्ण करण्याच्या दृष्टिकोनातून विकास पर्व २.० हा नवा टप्पा यानिमित्ताने सुरू होणार आहे. नव्या वर्षात दि. ३ जानेवारी रोजी दुपारी १ वाजता सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी या नगराध्यक्षा म्हणून आपली जबाबदारी सांभाळणार आहेत. नियमानुसार दिनांक २३.१२.२०२५ पासुन २५ दिवसाच्या आत पहिली सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात येणे अपेक्षित आहे. त्यादृष्टीने नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी पदभार स्वीकारल्यानंतर पहिली सर्वसाधारण सभा आयोजित करणे, उपाध्यक्ष निवडीबाबत आणि नामनिर्देशित सदस्यांच्या नियुक्तीच्या अनुषंगाने बाकी सर्व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण होणार आहेत. ***

# 'परळी परिसर'च्या दिवाळी अंकाचा पुण्यात डंका

## राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धेत तृतीय पुरस्कार जाहीर

**परळी वैजनाथ, (बातमीदार):- गेल्या दहा वर्षापासून परळी वैजनाथ (जि.बीड) येथून नियमित प्रकाशित होणाऱ्या साप्ताहिक 'परळी परिसर'च्या यंदाच्या दिवाळी अंकाला पुणे येथील 'मराठीबोली' या संस्थेने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धेत तृतीय पुरस्कार जाहीर झाला आहे.**

येत्या ४ जानेवारीला या पुरस्काराचे वितरण पुणे येथे एका खास समारंभात होणार आहे. मराठीबोलीच्या वतीने प्रसिद्धीला दिलेल्या पत्रकात ही माहिती देण्यात आली आहे. गेल्या मे २०१७ पासून परळी वैजनाथ येथून साप्ताहिक परळी परिसर हे वर्तमानत्र नियमित प्रसिद्ध होत आहे. परळी परिसरातील आठवडाभरातील घडामोडींसह प्रत्येक अंकात नवा विषय आणि नवा विचार मांडणाऱ्या या वर्तमानपत्राने बीड जिल्ह्यात वर्तमानपत्राच्या क्षेत्रात अग्रगण्य स्थान मिळविले आहे. सर्वसामान्यांच्या प्रश्नाला न्याय देण्याची भूमिका कायम ठेऊन दरवर्षी दिवाळीला निघणाऱ्या वाचनिय व दर्जेदार दिवाळी अंकाची परंपरा साप्ताहिक परळी परिसरने आजपर्यंत जपली आहे. यंदाचा परळी परिसरचा नववा दिवाळी अंक होता. प्रत्येक दिवाळी अंकात नवा विषय घेऊन अंक वाचकांच्या हाती दिला जातो. वाचकांकडून अंकाचे भरभरून स्वागत होते. परळी परिसरच्या यंदाच्या दिवाळी अंकात परळी पालिकेच्या कारभारावर 'कव्हर स्टोरी' प्रसिद्ध केली होती. याशिवाय विविध विषयावरील लेख, कवीता, कथा, ललित, पुस्तक परिक्षण, मनोरंजन, नागरी समस्या आदी साहित्य या अंकात समाविष्ट होते. बहुरंगी व




उत्कृष्ट मांडणी व दर्जेदार साहित्य यामुळे साप्ताहिक परळी परिसरचे दिवाळी अंक वाचकप्रिय ठरले आहेत. दिवाळी अंकाचा वाचकांनी सदैव गौरवच केला आहे.

मराठीबोली, पुणे या संस्थेने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय दिवाळी अंक २०२५ च्या स्पर्धेत साप्ताहिक परळी परिसरच्या यंदाच्या दिवाळी अंकाला तृतीय पुरस्कार जाहीर झाला आहे. या स्पर्धेसाठी राज्यभरातून निघणाऱ्या विविध नियतकालिके, दैनिके, साप्ताहिकांचे दिवाळी अंक होते. या अंकातून परळी परिसरच्या दिवाळी अंकाची तृतीय पुरस्कारासाठी संयोजकांकडून निवड करण्यात आली आहे. संस्थेच्या वतीने प्रसिद्धीला दिलेल्या पत्रकात ही माहिती देण्यात आली आहे. पुरस्काराचे वितरण येत्या ४ जानेवारीला पुणे येथील लालबहादूर शास्त्री मार्गावरील गांजवे चौक येथे असलेल्या पत्रकार भवन सभागृहात दुपारी होणार आहे. यावेळी हेमंत परब, शरद अत्रे यांच्यासह शिवाजी भापकर, परमेश्वर उमरदंड, साहेबराव पवळे, श्रीपाद टेंबे, रजनी धोंगडे, शिवाजी उराडे, तेजस्विनी आमले, रामेश्वर गोरे, भारत धंगेकर, युवराज गरूड, उत्तम सोनवणे, प्रिया खैरे पाटील, वैशाली गावंडे, रामचंद्र पाचुनकर, अरूण तुळजापूर, सचिन कुरकुटे आदी प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम होणार आहे.

परळी सारख्या छोट्या शहरातून प्रसिद्ध होणाऱ्या दिवाळी अंकाची दखल घेऊन पुरस्कार मिळतो ही परळीतील वर्तमानपत्रांसाठी अभिमानाची बाब आहे. या यशाबद्दल साप्ताहिक परळी परिसरच्या संपादक एस.एल.वाकडे, कार्यकारी संपादक ज्येष्ठ पत्रकार लक्ष्मण वाकडे व सर्व सहकारी टीमचे अभिनंदन येथे पत्रकार व मित्र परिवारांनी केले आहे. दरम्यान, दिवाळी अंकाचे वाचक, वर्गणीदार, अंकाला सदैव साहित्य पाठविणारे लेखक, कवी तसेच जाहिरातदार, विक्रेते आदींचे या गौरवाबद्दल संपादकांनी आभार मानले आहेत.**

# बीड जिल्ह्यातील नगराध्यक्षांमध्ये सर्वाधिक मताधिक्यात नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी ठरल्या 'धुरंधर' !

परळी वैजनाथ, (बातमीदार):- नुकत्याच झालेल्या नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीमध्ये परळी वैजनाथ नगरपरिषदेची निवडणूक वैशिष्ट्यपूर्ण निवडणूक ठरली आहे. या निवडणुकीला वेगवेगळ्या पैलूंची वेगवेगळी वैशिष्ट्ये असल्याचे बघायला मिळते. या अनुषंगानेच अतिशय अधोरेखित होणारी आणि वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे या निवडणुकीत नगराध्यक्षा म्हणून जनतेतून निवडून आलेल्या सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी या बीड जिल्ह्यातील सर्व नगरपालिकांमध्ये निवडून आलेल्या नगराध्यक्षांच्या तुलनेत सर्वाधिक मताधिक्य घेऊन विजयी झालेल्या नगराध्यक्षा ठरल्या आहेत. प्रतिस्पर्धी उमेदवारांपेक्षा १५६६२ इतके मताधिक्य घेत बीड जिल्ह्यातील निवडून आलेल्या नगराध्यक्ष मताधिक्यात सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी 'धुरंधर' ठरल्या आहेत.

परळी वैजनाथ नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीत ना. पंकजाताई मुंडे व आ.धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण महायुती झालेली परळी नगर परिषद ही एकमेव नगरपालिका होती. या ठिकाणी राज्यस्तरावरील महायुतीतील सर्वच घटक पक्ष यांना एकत्रित आणण्यात या दोन्ही नेतृत्वाला यश मिळाले. त्याचबरोबर परळीचे नगराध्यक्ष पद हे महिला प्रवर्गासाठी राखीव झाले. यासाठी उमेदवार कोण असणार याची उत्सुकता होती. परंतु जनतेतून उत्स्फूर्तपणाने आलेल्या सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांच्या नावावरच शिक्कामोर्तब झाले. अनेक अर्थाने वैशिष्ट्यपूर्ण ही निवडणूक झाली. सुरुवातीपासूनच ही निवडणूक नगराध्यक्ष पदासाठी एकतर्फी आहे असेच चित्र होते. घडलेही त्याच पद्धतीने. निवडणूक निकाल आल्यानंतर सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांचे मताधिक्य हे प्रतिस्पर्धी उमेदवारापेक्षा १५६६५ इतके आहे.

बीड जिल्ह्यामध्ये एकूण सहा नगरपरिषदेच्या निवडणुका झाल्या. यामध्ये बीड, गेवराई ,माजलगाव ,अंबाजोगाई, धारूर व परळी वैजनाथ या नगरपरिषदांचा समावेश होता. निवडणूक निकालानंतर अंबाजोगाई नगर परिषदेत नगराध्यक्ष पदावर विजयी झालेले नंदकिशोर मुंदडा हे २४९७ मताधिक्याने विजयी झाले आहेत. गेवराई येथील नगराध्यक्ष गीताकाकी बाळराजे पवार या ५०५४ एवढ्या मताधिक्याने विजयी झाल्या आहेत. माजलगाव नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार महेरील चाऊस या २९२३ मताधिक्य घेऊन विजयी झाल्या आहेत. बीड येथील नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रेमलता पारवे या ३७७९ मताधिक्य घेऊन विजयी झाल्या आहेत तर धारूर येथील नगराध्यक्ष पदाचे उमेदवार बालासाहेब जाधव हे ६६९ इतके मताधिक्य घेऊन विजयी झाले आहेत. या सर्वांमध्ये परळीच्या नगराध्यक्षा सौ .पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांचे मताधिक्य हे १५६६२ इतके आहे. या दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण विचार केला तर परळीच्या नगराध्यक्षा सौ . पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी या बीड जिल्ह्यात सर्वाधिक मताधिक्य घेऊन नगराध्यक्षांमधील 'धुरंधर' नगराध्यक्षा ठरल्या आहेत. **



# सावरकर पतसंस्थेच्या दिनदर्शिकेचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन

परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळीच्या बँकिंग क्षेत्रातील अग्रगण्य पतसंस्था म्हणून ग्राहकांच्या व परळीकरांच्या विश्वासाला पात्र ठरलेल्या स्वा. वि. दा. सावरकर नागरि सहकारी पतसंस्थेच्या वतीने सभासद, ग्राहकांसाठी दरवर्षी नव्या वर्षाची दिनदर्शिका प्रकाशित केली जाते. यावर्षीही सन २०२६ ची दिनदर्शिका काढण्यात आली. या दिनदर्शिकेचे विमोचन वैद्यनाथ देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त तथा प्रसिद्ध बालरोगतज्ञ डॉ. गुरुप्रसाद देशपांडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पतसंस्थेच्या संचालिका सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांची परळीच्या नगराध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा संस्थेच्या वतीने हृद्य सत्कार करण्यात आला.

स्व.वि.दा.सावरकर नागरी सहकारी पतसंस्था कार्यालयात नव्या वर्षाच्या दिनदर्शिकेचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पतसंस्थेचे चेअरमन बाजीराव भैय्या धर्माधिकारी, डॉ. गुरूप्रसाद देशपांडे, उपाध्यक्ष अनिल अष्टेकर, संचालक राजेभाऊ मराठे, रवी वळसे, पतसंस्थेचे व्यवस्थापक किरण सावजी, कर्मचारी अश्विन बुरकुले, महेश घेवारे, अजिंक्य कुलकर्णी, जालिंदर गिरी, शुभम काकडे, नित्य ठेव संचय प्रतिनिधी दीपक कुसुमकर, राहुल रोडे, अनंत कस्पटे, कृष्णा शिंदे आदी उपस्थित होते.

# परळी तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी रानबा गायकवाड कार्याध्यक्षपदी नितीन ढाकणे तर शहराध्यक्षपदी शेख मुकरम



परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी शहर व तालुका पत्रकार संघाची २०२६ या नवीन वर्षाची कार्यकारणी नुकतीच निवडण्यात आली. तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी दैनिक सम्राटचे प्रतिनिधी रानबा गायकवाड यांची तर शहराध्यक्षपदी दैनिक सिटीजनचे प्रतिनिधी शेख मुकरम यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. येत्या ६ जानेवारी रोजी परळी शहरात भव्य दर्पण दिन सोहळ्याचे आयोजन करण्यात येणार आहे. परळी शहरातील लोकनेते गोपीनाथराव मुंडे पत्रकार भवन येथे दिनांक २५ डिसेंबर रोजी दैनिक पुण्यनगरीचे प्रतिनिधी धनंजय आरबुने यांच्या अध्यक्षतेखाली पत्रकार संघाची बैठक संपन्न झाली. या बैठकीत परळी तालुका व शहर पत्रकार संघाची नवीन कार्यकारणी निवडण्यात आली. यामध्ये तालुका पत्रकार संघाचे अध्यक्षपदी ज्येष्ठ पत्रकार दैनिक सम्राट चे प्रतिनिधी रानबा गायकवाड, उपाध्यक्ष पत्रकार सय्यद सबात अली,तालुका कार्याध्यक्ष दैनिक अतुल्य महाराष्ट्राचे संपादक नितीन ढाकणे, तालुका उपाध्यक्ष अनुप कुसुमकर, सचिव दैनिक बीड चौफेरचे बालाजी ढगे, सहसचिव शेख मुदस्सीर,तर शहराध्यक्षपदी दैनिक सिटीजनचे प्रतिनिधी शेख मुकरम, शहर उपाध्यक्ष समीर इनामदार, सचिव दैनिक रणझुंजार चे पत्रकार संतोष जुजगर, सहसचिव दैनिक लोकमत समाचार चे पत्रकार शेख अफसर तर कार्यकारणी मध्ये गावकरीचे पत्रकार जगदीश शिंदे, दैनिक जंग बीड, पत्रकार बाबा शेख, पत्रकार अमोल सूर्यवंशी, मुंबई जंगचे संपादक बालासाहेब मुजमुले याबरोबरच सल्लागार म्हणून ज्येष्ठ पत्रकार लक्ष्मण वाकडे, धनंजय आरबुने, जगदीश शिंदे, भगवान साकसमुद्रे सहआदींचे निवड करण्यात आली आहे.

दरम्यान तेथे सहा जानेवारी २०२६ रोजी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांचा दर्पण दिन परळी शहरात भव्य प्रमाणात साजरा करण्यात येणार असल्याचे या बैठकीत ठरविण्यात आले.या बैठकीचे सुत्रसंचलन दैनिक पुण्यभुमीचे पत्रकार भगवान साकसमुद्रे यांनी केले. **

# साहित्याची सामाजिक जबाबदारी उजळणारी व्याख्यानमाला-प्रा.डॉ.धायगुडे



परळी वैजनाथ, (बातमीदार):- डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, संभाजीनगरच्या विद्यापीठ विकास मंडळाच्या मान्यतेने व अनुदानाने घेण्यात येत असलेल्या व्याख्यानमालेत कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात बोलत असताना प्रा.डॉ.राजाभाऊ धायगुडे यांनी प्रा. वा. ल. कुलकर्णी यांचे साहित्य क्षेत्रात समीक्षक म्हणून दिलेले योगदान यावर प्रकाश टाकत टाकत या व्याख्यानमालेबद्दल गौरवोद्गार काढताना, ''साहित्याची सामाजिक जबाबदारी उजळणारी ही व्याख्यानमाला आहे. '' असे मतही नोंदविले.

प्रा. डॉ. राजाभाऊ धायगुडे यांनी यावेळी प्रा.वा.ल. कुलकर्णी यांचा वाङ्मयीन दृष्टिकोन आणि कलावादी विचार ,लेखनातील ऐतिहासिक आणि वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा शोध यावर प्रकाश टाकला.प्रा संजय आघाव यांनी यावेळी ' मराठी साहित्य हे पर्यावरण संवेदनेने समृद्धआहे.'' असे मत मांडले. साहित्यातील पर्यावरणीय जागरूकतेचे विश्लेषण करत त्यांनी यावेळी निसर्गाशी निगडित साहित्यिक कल्पना आणि समकालीन आव्हानांचा उल्लेख केला.हे व्याख्यान मराठी साहित्यातील पर्यावरण संरक्षणाच्या भूमिकेवर प्रकाश टाकणारे ठरले.अध्यक्षीय मनोगत व्यक्त करत असताना संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा.प्रसादजी देशमुख यांनी मराठी साहित्याचे महत्त्व विशद करत त्यात प्रा.वा.ल कुलकर्णी यांचे योगदान यावरही दृष्टीक्षेप टाकला.

या व्याख्यानांमुळे साहित्यिक आणि पर्यावरणीय चर्चेला नवे आयाम मिळाले.जे मराठी वाङ्मयाच्या अभ्यासासाठी उपयुक्त ठरले . श्रोत्यांनी या विषयांवर सखोल चर्चा केली आणि साहित्याच्या सामाजिक जबाबदाऱ्यावर भर दिला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्या डॉ. विद्याताई देशपांडे यांच्या मार्गदर्शनानुसार डॉ.श्याम नेरकर , प्रा.डॉ. कल्याणकर राजश्री , प्रा.डॉ. जोशी आर.एल , प्रा.डॉ.गोविंद कुलकर्णी, प्रा.डॉ.अरुण चव्हाण, प्रा.अशोक पवार यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रकटन प्रा.डॉ.राजकुमार यल्लावाड यांनी केले. ***

# परळी नगर परिषदेचे उपाध्यक्षपद राजस्थानी समाजाला देऊन न्याय द्यावा-चंद्रप्रकाश काबरा

परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी वैजनाथ नगरी चा निस्वार्थी भावनेने सर्वांगीण विकास करण्यासाठी परळी नगर परिषदेच्या उपाध्यक्ष पदी राजस्थानी समाजातील उमेदवार देण्याची मागणी समाजातील विविध संघटना आणि पदाधिकारी यांनी केली आहे.

नुकत्याच झालेल्या परळी वैजनाथ नगर परिषदेच्या निवडणुकीत मा. ना. पंकजाताई मुंडे, मा. मंत्री तथा आमदार धनंजयजी मुंडे. यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस (अ.प.ग.), भा.ज.पा. आणि शिवसेना (शिंदे गट) महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. परळीतील राजकारणात पक्ष कुठलाही असो, त्यातील मा. पक्ष नेतृत्वाने राजस्थानी समाजातील विविध सर्वगुणसंपन्न व्यक्तिंना न्याय देऊन विविध प्रकारे परळीच्या जडणघडणीत खारीचा वाटा उचलण्याची संधी दिली आहे. त्या संधीचा पुरेपूर उपयोग करून त्यांनी निस्वार्थ आणि सचोटीने काम करून पक्षासाठी निश्चितच उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात आदरणीय स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या पासून वर्तमान काळापर्यंत जसा परळी शहराचा नेहमी दबदबा राहिला आहे, किंचित तसाच परळीतील राजस्थानी समाजातील व्यक्ती समाजातील प्रदेश आणि राष्ट्रीय पातळीवर विविध सामाजिक संघटना मध्ये अनेक प्रकारच्या पदावर कार्यरत असून समाजातील विविध प्रश्नांवर काम करत आहेत.

मा.ना.पंकजाताई मुंडे आणि मा. मंत्री तथा आमदार धनंजयजी मुंडे यांच्या सोबत राजस्थानी समाजातील एक एकनिष्ठ कार्यकर्त्यांची फळी नेहमीच उभी राहिलेली आहे. त्यांच्यावर विश्वास ठेवून नेत्तृत्वाने तीन उमेदवारांना संधी दिली होती, तर शत-प्रतिशत तीनही उमेदवार निवडून येण्यात यशस्वी झाले आहेत.

निवडून आलेले तीन्ही उमेदवार समाजातील प्रतिष्ठित आणि विविध संघटनांचे पदाधिकारी आहेत. त्यातील कोणालाही उपाध्यक्ष पदासाठी संधी उपलब्ध करून दिली तर प्रत्येक उमेदवार त्या पदाला निश्चितच न्याय देतील आणि संधीच सोन करतील यात शंका नाही. करीता पक्ष नेतृत्वाने राजस्थानी समाजातील उमेदवारांना उपाध्यक्ष पदी नियुक्ती करावी अशी मागणी ''मासीक माहेश्वरी गर्जना'' चे संपादक चंद्रप्रकाश काबरा, परळी विविध व्यापारी संघटनेचे उपाध्यक्ष नंदकिशोर बियाणी, परळी तालूका माहेश्वरी सभेचे सचिव विनोद लड्डा आदींनी केली आहे. ***

**सा.परळी परिसर चे**
**वार्षिक वर्गणीदार व्हा!**
**-० अंकासाठी संपर्क ०-**
**मो.९४२२३२८४९३**

संपादकीय...

# हिवाळाही कडकच...!

**✲ सुविचार ✲**

**केवळ तुमच्याच अटींवर आणि तुमच्या मनासारखं आयुष्य जगायला सुरूवात करा..!**

यंदा मे महिन्यापासून सुरू झालेला पावसाळा ऑक्टोबरपर्यंत सुरूच होता. त्यामुळे यंदाचा पावसाळा सहा महिन्याचा झाला होता. मागच्या कितीतरी वर्षात प्रथमच एवढे दिवस पावसाळा लांबल्याची यंदाची ही पहिलीच वेळ होती. ऑक्टोबर म्हणजे हिवाळा सुरू होऊनही पाऊस थांबायचे नाव घेत नसल्याने यंदा थंडी पडते की नाही? असा प्रश्न पडला होता तर काही मंडळी पाऊसकाळ जास्त झाल्याने यंदा तीव्र थंडी किंवा कडाक्याचा हिवाळा असणार! हा अंदाज मांडत होते. त्यांचे तसे खरेही झाले आहे. ऑक्टोबर महिन्यात पावसाळा थांबल्यानंतर नोव्हेंबर महिन्यापासून आपल्याकडे थंडीला सुरुवात झाली. नोव्हेंबरमध्ये काही भागात पुन्हा पाऊस पडला. त्यामुळे थंडी गायब झाली. हा पाऊस थांबल्यावर पुन्हा थंडीला सुरुवात झाली. गेल्या एक-दीड महिन्यापासून आपल्याकडे कडाक्याची थंडी आहे. या काळात रात्रीचे तापमान आठ ते दहा अंशापर्यंत खाली आल्याचे आपल्याला जाणवले. दिवसाही थंडीची 'हुडहुडी' यंदा अनेक दिवस आपण अनुभवली व सध्याही ती अनुभवतो आहोत. जानेवारी म्हणजे नवीन वर्ष सुरू झाल्यानंतरही पुढील काही दिवस अशीच थंडी आपल्याकडे कायम राहणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. अहिल्यानगर, बीड, परभणी, नांदेड या जिल्ह्यात यंदा तापमानाचा पारा कमालीचा खाली आला होता. छत्रपती संभाजीनगर, जालना जिल्ह्यातही यंदा चांगलीच थंडी होती. बऱ्याच वर्षानंतर आपल्याकडे हिवाळा गेला आणि सध्याही जात आहे. यंदाची थंडी तीव्र व बोचरी असल्याने लहानमुले, वृद्ध व नागरिकांना या थंडीची चांगलीच 'हुडहुडी' भरली आहे. त्यामुळे त्यांचे आजारी पडण्याचे प्रमाण अधिक होते. मोठ्या थंडीने सर्दी पडसे, खोकला, ताप या आजाराने अनेकांना बेजार केले. यामुळे रूग्णालयात अशा रूग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली.

लांबलेला पावसाळा व त्यानंतर सुरू झालेली कडाक्याची थंडी यामुळे यंदाच्या रब्बी हंगामावर मोठा परिणाम झाला. अनेक ठिकाणी रब्बीच्या पेरण्यांना उशीर झाला. शेत जमिनीतील साचलेले पाणी आटायला वेळ लागला व त्यानंतर जमिनीची पेरणीसाठी मशागत करण्यात मोठा वेळ गेल्याने पेरण्यांना यंदा उशीर झाला. त्यामुळे डिसेंबरच्या प्रारंभी पर्यंतही रब्बीच्या पेरणीची काम आपल्याकडे चाललेले होते. यंदा २० डिसेंबरपर्यंत परळी तालुक्यात १४ हजार ४४९ हेक्टर क्षेत्रापैकी १२ हजार ४७२ हेक्टरवर रब्बीच्या पेरण्या झाल्या होत्या. त्याचे प्रमाण ८६.३०% एवढे होते. जमिनीत ओलावा चांगला असल्याने व अनुकूल हवामान असल्यामुळे रब्बीच्या उत्पादनात यंदा चांगली वाढ होईल, अशी आशा शेतकऱ्यांना आहे.

पावसाळ्यानंतर भाजीपाला लागवडीसाठी यंदा उशीर झाल्याने ऐन सीझनमध्ये व हिवाळा सुरू होऊनही आपल्याकडे पालेभाज्या व फळभाज्यांचे दर चढतेच होते. त्यातच पुरेशी आवक नसल्याने विक्रेत्यांनी भाजीपाला आव्वाच्या सव्वा दरात विकला. त्यामुळे सर्वसामान्यांची मोठी गैरसोय झाली. मेथी, पालक, शेपू यांसह वांगी, दोडके, कारले, गवार, हिरवी मिरची, टोमॅटो या भाज्यांचे दर तर मोठेच होते. आजपर्यंत एवढा महाग भाजीपाला तोही ऐन सीझनमध्ये विकला गेला. डिसेंबरच्या शेवटी मात्र या भाज्यांचे दर काही प्रमाणात उतरले, परंतु गवार, दोडके, कारले, टोमॅटो, हिरवी मिरची यांचे भाव आजही चढतेच आहेत. ३० रुपये पाव विकणारी मेथी आता दहा रुपयावर आली आहे. कोथिंबीर, पालक, शेपू व इतर भाज्यांचे दरही सध्या घसरले आहेत. शिवाय बाजारात या भाज्यांची आवक वाढल्याने त्यांचा सध्या सर्वत्र सुकाळ आहे. यामुळे सर्वसामान्यांची गैरसोय दूर झाली आहे.

कडाक्याच्या थंडीमुळे बाजारपेठेत यंदा गरम, उबदार कपड्यांची खरेदी सर्वसामान्यांनी मोठ्या प्रमाणात केली. त्यामुळे कपड्यांची दुकाने यंदा थंडीत गरम होती. बाहेर गावाहूनही गरम कपडे येथे विक्रीसाठी आणलेल्यांचा धंदा चांगला झाला आहे. बऱ्याच वर्षानंतर यंदाचा गरम कपड्यांचा सीझन चांगला गेल्याचे हे विक्रेते सांगत आहेत. एकूणच यंदाचा हिवाळा कडक गेल्याने अनेकांचे भले झाले आहे. कडक हिवाळ्यामुळे बाजारात सुकामेवाही मोठ्या प्रमाणात विकला गेला. यातील अनेक वस्तूंचे भाव सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर जाऊनही त्याची खरेदी ग्राहकांनी मोठ्या प्रमाणात केल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. ✱✱✱

# 'आनंदीबाई शिर्के : काळाच्या पडद्याआड दडलेले एक उज्वल पर्व'

## ग्रंथ परीक्षण

मराठी साहित्य आणि समाजजीवनात अनेक कर्तृत्ववान स्त्रिया होऊन गेल्या, ज्यांनी आपल्या लेखणीतून आणि कृतीतून महत्त्वपूर्ण योगदान दिले. दुर्दैवाने, त्यापैकी काही जणींचे कार्य म्हणावे तितके प्रकाशात आले नाही. यापैकीच एक महत्त्वाचे नाव म्हणजे आनंदीबाई शिर्के. त्यांचे साहित्य आजही अनेक स्तरांवर प्रेरणादायी ठरते, कारण ते केवळ तत्कालीन समाजाचे प्रतिबिंब नव्हते, तर भविष्याकडे पाहण्याची एक दूरदृष्टीही त्यात होती. त्यांच्या याच समग्र साहित्यावर आधारित, प्रा. डॉ. सुषमा जाधव गुळूमकर यांनी केलेला सखोल अभ्यास, संशोधन आणि त्यातून साकारलेला ग्रंथ 'आनंदीबाई शिर्के: शब्दांच्या पलीकडील सत्य' हे मराठी साहित्यविश्वासाठी एक महत्त्वपूर्ण आणि अभ्यासपूर्ण योगदान आहे.

या ग्रंथाला ज्येष्ठ साहित्यिक तथा चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालय शिरूर येथील मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. बाळकृष्ण लळीत यांची चिंतनशील, अनमोल प्रस्तावना लाभली आहे.ते आपल्या प्रस्तावनेत म्हणतात-'आजच्या काळात आणि भविष्यातही हे संशोधनपर मूल्यमापन मराठी साहित्यात महत्वाचे ठरणार आहे'.डॉ.सुषमा जाधव-गुळूमकर यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव वाळुंज यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी. पूर्ण



केली. त्यांनीही प्रस्तुत ग्रंथात आपला आशयघन अभिप्राय नोंदविला आहे.ते लिहितात-'विसाव्या शतकाच्या सुरुवातीला, जेव्हा समाजातील रूढीवादी विचार खूप प्रभावी होते,तेव्हा आनंदीबाई शिर्के यांनी आपल्या लेखणीतून ठामपणे स्त्रीवादी भूमिका मांडली. डॉ. सुषमा जाधव-गुळूमकर यांचा सदरील ग्रंथ साहित्यिक, संशोधक व अभ्यास कांसाठी एक महत्वाच दस्तऐवज ठरेल.'तसेच तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी आनंदीबाई शिर्के यांच्यासारख्या दूरदृष्टीच्या लेखिकांना योग्य सन्मान देण्याचे आणि त्यांच्या विचारांचा प्रसार करण्याचे हे कार्य निश्चितच प्रशंसनीय असल्याचे प्रतिपादन केले आहे.आनंदीबाई शिर्के म्हणजे मराठी साहित्य विश्वातील मानाचं पान असून डॉ. सुषमा जाधव-गुळूमकर यांनी आनंदीबाई शिर्के यांच्या साहित्याचे सामाजिक आणि वाड्मयीन मूल्यमापन साक्षेपाने व नेटकेपणाने केले आहे असे मत ,तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील कला शाखा अधिष्ठाता व प्रमुख, मराठी संशोधन केंद्र, डॉ. सीमा नाईक-गोसावी यांनी आपल्या अभिप्रायात मांडले आहे. साहित्य अभ्यासक व रंगकर्मी प्रा.डॉ. सिद्धार्थ तायडे यांनी 'आनंदीबाई शिर्के:काळाच्या पडद्याआड दडलेले एक उज्वल पर्व डॉ. सुषमा जाधव गुळूमकर यांनी प्रस्तुत ग्रंथात अधोरेखित केले असल्याचे स्पष्ट केले आहे.

**जीवन आणि साहित्याची पार्श्वभूमी:-** हा ग्रंथ केवळ आनंदीबाई शिर्के यांच्या साहित्याची एकत्रित मांडणी करत नाही, तर त्यांच्या जीवनातील विविध पैलूंचाही चिकित्सक अभ्यास करतो. लेखिकेने आनंदीबाईंच्या जीवनप्रवासाचा परिचय करून देताना, त्यांच्या सामाजिक आणि कौटुंबिक पार्श्वभूमीचा सविस्तर संदर्भ दिला आहे. तत्कालीन समाजातील स्त्रियांची स्थिती, शिक्षण, बालविवाह, विधवाविवाह बंदी आणि पडदा पद्धतीचे दुष्परिणाम या आव्हानांवर मात करत आनंदीबाईंनी आपले लेखन कसे समृद्ध केले, यावर हा ग्रंथ प्रकाश टाकतो. लेखिकेने विविध उदाहरणांच्या आधारे आनंदीबाईंची निरीक्षणशक्ती आणि समाजाचे सूक्ष्म आकलन अत्यंत प्रभावीपणे मांडले आहे.

**सामाजिक संवेदनशीलता आणि स्त्रीवादी दृष्टिकोन:-** ग्रंथाचा मुख्य गाभा म्हणजे आनंदीबाईंच्या साहित्यातील अद्वितीय सामाजिक संवेदनशीलता आणि पुरोगामी स्त्रीवादी दृष्टिकोन. त्यांनी केवळ स्त्रियांच्या समस्या मांडल्या नाहीत, तर त्यामागील कारणमीमांसा करून उपाययोजनांचीही सूचक मांडणी केली. पारंपरिक सामाजिक रूढी झुगारून देण्याची त्यांची भूमिका आणि समानतेसाठीचा आग्रह डॉ. गुळूमकर यांनी सूक्ष्मपणे विशद केला आहे. हे विश्लेषण आनंदीबाईंच्या साहित्याला एका व्यापक सामाजिक संदर्भात उभे करते, जे आजही तितकेच प्रासंगिक वाटते.

**वाङ्मयीन मूल्यमापन आणि मराठी साहित्यातील स्थान:-** डॉ. सुषमा जाधव-गुळूमकर यांनी आनंदीबाईंच्या कथा, कविता, लेख आणि निबंध यांसारख्या विविध साहित्य प्रकारांचे अभ्यासपूर्ण मूल्यमापन केले आहे. त्यांची भाषाशैली, आशयाची मांडणी, अलंकारिक वापर आणि प्रादेशिक बोलीभाषेचा प्रभाव यावर सविस्तर चर्चा केली आहे. ग्रंथात लेखिकेने तटस्थपणे आनंदीबाईंच्या साहित्यातील सौंदर्यस्थळे आणि मर्यादांचे परीक्षण करून, त्यांचे मराठी साहित्य परंपरेतील स्थान निश्चित केले आहे.

**समकालीनता आणि प्रेरणादायी वारसा:-** आजच्या युगातही स्त्री-पुरुष समानता, घरगुती हिंसाचार आणि स्त्रियांचे कामाच्या ठिकाणचे स्थान हे प्रश्न अनुत्तरित आहेत. अशा काळात आनंदीबाईंचे विचार दिशादर्शक ठरतात. हा ग्रंथ केवळ एक ऐतिहासिक दस्तावेज न राहता, वर्तमान आणि भविष्यासाठी एक मार्गदर्शक ठरतो. नव्या पिढीला समाजसुधारणेच्या प्रवाहातील आनंदीबाईंच्या योगदानाची ओळख करून देण्याचे महत्त्वाचे कार्य या ग्रंथाने केले आहे.

एकंदरीत, प्रा. डॉ. सुषमा जाधव गुळूमकर यांचा हा ग्रंथ एका विस्मृत लेखिकेचे यथायोग्य पुनरुत्थान करणारा आहे. लेखिकेचे अथक परिश्रम आणि अभ्यासपूर्ण दृष्टी यामुळे हा ग्रंथ संशोधक, अभ्यासक आणि सामान्य वाचकांसाठी एक मैलाचा दगड ठरेल.हर्षवर्धन प्रकाशनाचे प्रकाशक डॉ.बापू घोलप यांनी पुस्तकाची मांडणी, बांधणी सुबक आणि सुंदर केली आहे. आनंदीबाई शिर्के यांची नात सौ. मिराताई शिंदे यांच्याकडून आनंदीबाई शिर्के यांचे अप्रकाशित साहित्य उपलब्ध करून दिले तसेच आनंदीबाई शिर्के यांची नात सौ. नीता डांगे यांनी मुखपृष्ठासाठी आनंदीबाईंचे छायाचित्र उपलब्ध करून दिले आहे.त्यांच्या विषयी लेखिकेने कृतज्ञता व्यक्त केली आहे.मराठी साहित्य विश्वातील एका महत्त्वाच्या स्त्री लेखिकेला यथायोग्य न्याय देण्याचे कार्य या ग्रंथाने केले असून,तो भविष्यातील संशोधकांसाठी निश्चितच दीपस्तंभ ठरेल.

**- प्रा.डॉ.सिद्धार्थ तायडे,**
परळी वैजनाथ.

**'परळी परिसर'** हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतीलच असे नाही.)
**RNI No.-MAHMAR/2017/74640** **Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25** (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) **www.parliparisar.com**
✲ वर्ष ०९ ✲ अंक ३४ ✲ पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) सोमवार, दि. २९ डिसेंबर २०२५ ✲ किंमत : २ रू.

# निवडणुकीत परळीत 'मराठा कार्ड' का फसते? ते का चालत नाही?

**बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ विधानसभेच्या निवडणुकीसह गेल्या पंधरा वर्षात झालेल्या परळी पालिकेच्या निवडणुकीत निवडणूक लढवणाऱ्या 'मराठा' नेतृत्वाला एकदाही विजयाचा गुलाल लागला नाही. मतदार संघात या समाजाची लोकसंख्या लक्षणीय असूनही निवडणुकीत येथे 'मराठा कार्ड' का फसते? ते का चालत नाही? हे प्रश्न आता येथे नागरिकांना पडले आहेत.**

बीड जिल्ह्यात बालाघाट डोंगररांगाच्या कुशीत वसलेला व महागंगा गोदावरीच्या सानिध्याने पावन झालेला परळी परिसर. या भागात मराठा, वंजारा तसेच हटकर, धनगर, लिंगायत, बंजारा, दलित, मुस्लिम यांची लोकसंख्या मोठी आहे. त्यात मराठा, वंजारा समाज अधिक आहे. त्यामुळे सुरुवातीपासूनच या दोन्ही समाजाभोवती इथले राजकारण चालत आले आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर झालेल्या १९५२ च्या विधानसभेच्या निवडणुकीत या भागाचे पहिले आमदार होण्याचा मान परळीचे भूमिपुत्र कै.वामनराव देशमुख यांना मिळाला. नव महाराष्ट्राच्या निर्मिती अगोदरचा हा काळ होता. तेव्हा आपला भाग हैदराबाद विधानसभेला जोडला गेलेला होता. पुढे नव महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर परळी परिसर रेणापूर व त्यानंतर आता परळी विधानसभा मतदारसंघात आहे. परळीसह सिरसाळा, घाटनांदुर, धर्मापुरी, नागापूर ही इथली मोठी गावे आहेत. इथे अनेक तगडे मराठा पुढारी असूनही कै.वामनराव देशमुख यांच्यानंतर गेल्या पाऊणशे वर्षात एकाही मराठा नेत्याला आजपर्यंत विधानसभेच्या निवडणुकीत यशाचा गुलाल लागलेला नाही. घाटावरचे ज्येष्ठ नेते बाबुराव आडसकरांपासून ते आताच्या राजसाहेब देशमुख माकेगावकर यांच्यापर्यंत येथून विधानसभेची निवडणूक लढवणाऱ्या मराठा नेतृत्वाला पराभवच स्वीकारावा लागला आहे. 'आमचा इथे नाद करायचा नाही!' हा संदेश प्रत्येक निवडणुकीत वंजारा समाज येथे देत आला आहे. मराठा समाज येथे बहुसंख्येने असूनही या समाजाच्या नेतृत्वाला यश न मिळण्याची अनेक कारणे आहेत. या कारणावर इथल्या नेतृत्वाने कधीही लक्ष दिले नाही की त्याकडे गांभीर्याने पाहिले नाही. त्यामुळे विविध निवडणुकीत अपयशच मराठा नेतृत्वाच्या पदरी पडत आले आहे. नुकत्याच झालेल्या परळी पालिकेच्या निवडणुकीत तसेच यापूर्वीच्याही काही पालिका निवडणुकीत मराठा नेतृत्वाला पराभवाचा सामना करावा लागला आहे, या पराभवाची जिल्ह्याच्या राजकारणात चवीने चर्चा रंगलेली आपण पाहतो.

कोणतीही निवडणूक लढवायची असल्यास त्या निवडणुकीची कितीतरी दिवस अगोदर पासून तयारी करावी लागते. अशी कोणतीच तयारी निवडणूक लढवणारे कोणतेच मराठा नेतृत्व इथे करत नाही. निवडणुका जाहीर होताच प्रतिष्ठा लावून पक्ष नेतृत्वाकडून उमेदवारी मिळवायची किंवा अपक्ष म्हणून ऐनवेळी निवडणुकीच्या मैदानात उतरून कोरड्या डरकाळ्या व फुसक्या हाबूक ठोकून नुसतीच हवा करायची. मतदानावेळी भक्कम यंत्रणा लावायची नाही आणि निवडणुकीत पराभवाची शाल पांघरून झोपायचे आणि वर म्हणायचे, 'लढलो की नाही! 'एवढी मते पडली! समोरच्याला बेजार तर केले!' असे म्हणत आपणच आपले समाधान करून घ्यायचे, असे चित्र प्रत्येक निवडणुकीत इथे आपण पाहत आलो आहोत.

सर्वसामान्य नागरिकांत मिसळून, त्यांच्या सदैव संपर्कात राहून नागरिकांच्या समस्या, प्रश्न सोडविणे, त्यांच्या सुखदुःखात सामील होणे, गावातील, मतदार संघातील महत्त्वाच्या एखाद्या प्रश्नासाठी रस्त्यावर उतरून तीव्र संघर्ष करणे, हा प्रश्न सुटावा म्हणून त्यासाठी शेवटपर्यंत लढत राहणे असे इथे कधीच मराठा नेतृत्वाने केलेले दिसत नाही. या नेतृत्वाकडे कार्यकर्त्यांचे पुरेसे संख्याबळ नाही, मतदार संघातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोच नाही, गाव, वाडी, वस्त्यावर कधी जाणे-येणे नाही, मतदार संघाचा इतिहास, भूगोल पुरेसा ज्ञात नाही, गावासह मतदार संघात होणाऱ्या विविध उत्सवाला, कार्यक्रमाला हजेरी नाही की त्यासाठी सढळ हाताने सहकार्य नाही. सरकार दरबारी खेटे घालून, प्रयत्न करून एखादा विकास प्रकल्प आपल्या गावात व गावातल्यांसाठी आणला असेही नाही. संपर्क कार्यालय सुरू करून तिथे वेळ देऊन सर्वसामान्यांचे प्रश्न कधीच जाणून घेतले गेले नाहीत की त्यासाठी काही केले नाही. सर्वसामान्यांच्या मनात आपलेपणाचे स्थान निर्माण व्हावे, असे कोणतेच कामही येथे या नेतृत्वाचे नाही. 'मला मोठे म्हणा!' असे म्हणत केवळ मोठेपणाने जगायचे. डोक्यावर बर्फ आणि तोंडात साखर ठेवून वावरायचे नाही, 'माजला का...! शहाणा झाला का...! भलताच चढलास, तिकडे लई चाललास..!' असं बोलून जवळच्या कार्यकर्त्याचा अपमान करायचा, त्यांची मन दुखवायची आणि ही माणसं तोडायची. माणसं, कार्यकर्ते जोडण्याऐवजी त्यांना बोलण्यातून, आपल्या कृतीतून दुखवायचे, हिनवायचे, त्यांच्या फारसे उपयोगी पडायचे नाही, मीडिया सांभाळायचा नाही, समाजात, माध्यमात चर्चेत राहायचे नाही, समाजात उभ्या राहणाऱ्या नव्या नेतृत्वाला साथ देण्याऐवजी त्यांचे पाय ओढायचे, सर्वसामान्यांच्या मदतीला धावून जायचे नाही, सतत पक्षांतर करायचे अशा अनेक कारणांमुळे इथे तगडे व विरोधकांच्या तोडीस तोड मराठा समाजाचे नेतृत्व उदयास येऊ शकले नाही. त्यात राजकारण किंवा समाजकारण झोकून देऊन करायचे नाही, वेळ मिळेल तसे सोयीप्रमाणे हे काम करायचे. त्यामुळे कणखर नेतृत्व येथे तयार होत नाही. त्यातच 'मीच मोठा..माझेच खरे..!' असे म्हणून इतरांना खालचे लेखायचे.

**- लक्ष्मण वाकडे, पत्रकार, परळी वैजनाथ.**

आपल्या कामातून, वागणुकीतून राजकारणात, सर्वसामान्यांत दृढ विश्वास, आदर, मोठेपणा निर्माण होईल, असे वागायचे नाही की तसे काम करायचे नाही. बऱ्याच वेळा विरोधकांशी हात मिळवणी करत कार्यकर्त्यांचा विश्वासघात करायचा. या भूमिकेमुळेही मराठा नेतृत्वाचे येथे नुकसान झाले आहे. त्यात मराठा समाज व त्यांचे नेते एकत्र येऊ नयेत म्हणून विरोधक राजकारण व राजकारणातील डाव टाकतात. त्यात ते येथे सदैव यशस्वी होत गेल्याने याची मराठा नेतृत्वाला मोठी किंमत मोजावी लागली आहे.

कोपर्डीची घटना, त्यानंतर मराठा योद्धे मनोज जरांगे पाटील यांचे आरक्षणाचे आंदोलन यामुळे जिल्ह्यातील मराठा समाज एकवटला. त्याचा परिणाम म्हणून गेल्या लोकसभेच्या निवडणुकीत बजरंगबप्पा सोनवणे हा सर्वसामान्य कार्यकर्ता जिल्ह्याचा खासदार झाला. या निवडणुकीपासून जिल्ह्यातील विरोधी नेते मंडळींनी व पुढाऱ्यांनी मराठ्यांच्या विरुद्ध डोके लावून छुपा व उघड तीव्र संघर्ष सुरू केला आहे. ओबीसीसह इतर समाजाची माथी भडकवून मराठा समाजापासून त्यांना तोडण्याचे राजकारण केले जात आहे. त्यात ते यशस्वीही होत आहेत. मराठा समाजाचे काही लाचार कार्यकर्ते समाज व समाजाचे हित बाजूला ठेवून आपला स्वाभिमान विकत स्वतःला आपल्या स्वार्थासाठी विरोधकांच्या सतरंज्या उचलणे पसंत करतात. यामुळे समाजाचे मोठे नुकसान येथे होत आहे. मराठा समाजाचे तगडे नेतृत्व तयार होऊ दिले जात नाही. ते होऊ नये म्हणूनही समाजातील काही नेते व कार्यकर्त्यांना हाताशी धरून केलेल्या राजकारणात समाजविरोधी मंडळी यशस्वी होते. परिणामी परळी तालुक्यात तगडे मराठा नेतृत्व आजपर्यंत तयार होऊ शकले नाही. तसेच कोणत्याही निवडणुकीत ते यशस्वी होऊ दिले जात नाही.

मराठा समाजाच्या बैठका होत नाहीत, गुणवंतांचे गौरव सोहळे नाहीत, समाजाच्या प्रश्नावर चर्चा नाही, समाज एकवटणे व तो कायम एकसंघ रहावा म्हणून विशेष असे काही नाही. त्यातच गरजूंना मदत नाही, गरजवंत मुलांना, तरुणांना शिक्षणासाठी विशेष कार्यक्रम, उपक्रम नाहीत, त्यातच 'अकरा माशी, बारा माशी, ९६ कुळी, आम्हीच मोठे, आम्ही वरचे, हे खालचे' अशी आपसातील नकली लढाई खेळत बसून एकीत बेकी निर्माण करायची. यामुळे मराठा समाजाची ताकद इथे दिसत नाही. मोठी लोकसंख्या असूनही समाजाची व मराठा नेतृत्वाची पकड मतदार संघावर किंवा शहरावर राहिलेली नाही. समाजासाठी काही करावे, असे कुणाला येथे वाटतच नाही. त्यापेक्षा विरोधकांची लाचारी पत्करण्यात व तिथे जाऊन स्वाभिमान गहाण ठेवून सतरंज्या उचलण्यात काहींना धन्यता वाटते.

समाजातील विविध जातीधर्माला बरोबर घेऊन शहराच्या विकासाचा ध्यास घेत कै.एन.के.देशमुख यांनी येथे सत्ता गाजवली. आपल्या समाजकारण व राजकारणातून आदर्श निर्माण केला. दोन-तीन वेळा ते परळी पालिकेचे नगराध्यक्ष झाले. त्यानंतर त्यांच्यासारखे मोठे व लोकाभिमुख मराठा समाजाचे नेतृत्व येथे पुन्हा होऊ शकले नाही. परळी विधानसभा मतदारसंघात, परळी शहरात मराठा समाज मोठ्या संख्येने असूनही निवडणुकीत गुलाल का लागत नाही व तो लागावा म्हणून काय केले पाहिजे. यावर व्यापक चिंतन व विधायक कृती होणे गरजेचे आहे. कधी काळी नगराध्यक्षासह डझनावर नगरसेवक ज्या समाजाचे इथे असायचे तिथे आता या समाजाकडे नगराध्यक्षपदही राहिले नाही आणि नगरसेवक किती तर केवळ तीन! यामुळे समाजाची इथली ताकद कुठे गेली? हा प्रश्न पडतो.

शेतात राबून, कष्ट करून सधन शेतकरी असलेल्या इथल्या अनेक मराठ्यांची पोरं आज आपल्या शेतजमिनीची तुकडे विकून ऑटो रिक्षाचे डबडे घेऊन इथे मिरवत आहेत. कुणी पानटपऱ्या टाकून बसले आहेत तर अनेक तरुण हॉटेलमध्ये उष्ट्या कपबश्या विसळत आहेत. त्यांचे नेतृत्व मराठा समाजाचे नाही. मराठा उमेदवार निवडणुकीत पडला की हे मराठा समाजाचे तरुण म्हणतात. 'आमच्या नेत्याचा नाद करायचा नाही!' ही वेळ इथे समाजाच्या अनेक पोरांवर का व कुणामुळे आली. याचा विचारही होणे गरजेचे आहे.

एखाद्या कार्यकर्त्यावर मोठा अन्याय झाल्यास त्याच्या बाजूने खंबीरपणे उभे राहायचे नाही, 'काय झाले? असे विचारायचे. 'जाऊद्या आपल्याला काय करायचे!' असे म्हणून गप्प बसायचे हे धोरण इथल्या मराठा समाजासह नेत्यांनी स्वीकारल्याने या समाजात आपलेपणाची भावना कमी होत गेली आहे.

'काय बाबा मराठ्यांची सत्ता राज्यात आहे! त्यांचे दीडशेवर आमदार आहेत! मोठे पुढारी त्यांचेच आहेत! परळीत तरी आपली सत्ता असली पाहिजे..!' असे म्हणत इथली काही मंडळी इतर समाजाला मराठा नेतृत्वापासून, समाजापासून दूर करण्याचे काम करण्यात यशस्वी होत आहेत. मराठा आरक्षणाचा लढा यशस्वी झाल्यापासून मराठा समाजाला व समाजाच्या नेतृत्वाला पाण्यात बघण्याचे काम येथे सुरू झाले आहे. समाजाचा नेता व समाज यांच्याबद्दल द्वेषभावना येथे निर्माण केली गेली आहे. यामुळे सामाजिक ऐक्यात विष पेरण्याचे काम केले जात आहे. या द्वेषातून मराठा नेतृत्व व समाज आपला वैरी आहे, असे चित्र निर्माण करण्यात आले आहे.

परळीत मराठा समाजाने एकत्र आल्याशिवाय, मोठे योगदान दिल्याबद्दल तगडे नेतृत्व येथे उदयास येऊ शकणार नाही तसेच समाजाची ताकद दिसणार नाही. आपसात भांडायचे, मनभेद व मतभेद ठेऊन वागायचे, चोख व्यवहार ठेवायचा नाही, मराठ्यांनी मराठ्यांच्या हिताआड यायचे, समाजाचे नुकसान करायचे, या भूमिकेमुळे समाजाची ताकद येथे दुबळी झाली आहे, आपल्यापेक्षा इतर जातीचे बरे असे म्हणण्याची वेळ येथे मराठा समाजाच्या अनेकांवर आली आहे, याचा विचारही यानिमित्ताने व्हावा असे वाटते, मराठा नेतृत्व व समाजाच्या संस्था संपविण्याचे काम येथे डोके लाऊन चालले आहे, याचीही जाणीव ठेवणे गरजेचे आहे. दरम्यान, मतदानावेळी हजार, पाचशे घेऊन लाचार व्हायचे, समाज विरोधकांची गुलामी पत्करायची, ही वृत्ती संपल्याशिवाय मराठा नेतृत्व व समाज येथे उभा राहणार नाही. ***